**उलटतपास प्रतिवादी क्रं. १ ते ४ तर्फे पुकारले असता गैरहजर सबब, त्यांच्यावतीने उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्रं. ५ तर्फे श्री.डी.एल.घोगरे यांच्यामार्फत सुरु.**

**०७.** मी शिवाजी महाविदयालय उदगीर येथे रुजू होण्यापूर्वीच्या कागदपत्रांची माहिती मला नोटीस आल्यानंतर समजली. मोहनराव जगताप हे आमच्याकडे प्रबंधक या पदावर कार्यरत होते. ते दि.३१/०७/२००४ रोजी निवृत्त झाले. हे खरे की, निवृत्ती होणा-या कर्मचा-यांची सेवापुस्तीका तयार केलेली असते. हे खरे की, कर्मचारी निवृत्त होण्यापूर्वी या सेवापुस्तीकेचा ताबा कॉलेजकडे असतो. सेवापुस्तीकेमध्ये नामनिर्देशनाचा फॉर्म असतो यास माझे सांगणे २०१४-२०१५ सालापासून असा फॉर्म जोडला जाऊ लागला. हे खरे की, निवृत्त होणा-या कर्मचा-याची पेन्शन फाईल तो निवृत्त होण्यापूर्वी तयार झालेली असते. हे खरे की, पेन्शन फाईलमधील त्रुटींचा पुर्तता करुन संबंधीत कर्मचारी निवृत्त झाल्यावर ती फाईल नांदेड सह संचालक शिक्षण विभाग यांच्याकडे महाविदयालयांच्या प्राचार्यामार्फत पाठविली जाते. हे खरे की, मोहनराव जगताप यांची पेन्शन फाईल ते निवृत्त झाल्यानंतर प्राचार्यामार्फत नांदेड येथे सह संचालक शिक्षण विभाग येथे पाठविण्यात आली. हे खरे की, ती फाईल त्या कायदेशीर तरतूदींचा अभ्यास करुन त्यानंतर मंजूरीसाठी पाठविण्यात आली. या पेन्शन संचीकेमध्ये मुळ सेवापुस्तकेची एक प्रत पाठविली जाते. या संचीकेसोबत फॉर्म क्रं.१,३ व ४ हे पाठविले जातात. हे खरे की, फॉर्म क्रं. १ हा नामनिर्देशनाचा आहे. हे खरे की, फॉर्म क्रं.१ मध्ये जनाबाई मोहनराव जगताप यांचे नाव पत्नी म्हणून आहे. फॉर्म क्रं. ३ मध्ये कुटुंबाची सविस्तर माहिती नमूद असते हे खरे आहे. हे खरे आहे की, फॉर्म क्रं. ३ मध्ये जनाबाई मोहनराव जगताप ही पत्नी म्हणून दर्शविली आहे. हे खरे की, फॉर्म क्रं.३ मध्ये बाजीराव मोहनराव जगताप, कु.माया मोहनराव जगताप, राधा मोहनराव जगताप व जनाबाई मोहनराव जगताप अशी चार नावे आहेत. हे उखरे

की, फॉर्म क्रं. ४ हा कुटुंब निवृत्तीवेतन यांचे नामनिर्देशन करण्याचा फॉर्म आहे. हे खरे की, फॉर्म क्रं. ४ मध्ये जनाबाईचे नाव पत्नी म्हणून आहे. हे खरे की, फॉर्म क्रं.४१ हा पेन्शनधारकाच्या मृत्यूनंतर वारसांनी प्राचार्यांकडे अर्ज दिल्यावर, प्राचार्य तो फॉर्म भरतात. फॉर्म क्रं. ४१ मध्ये जनाबाई मोहनराव जगताप यांचे पत्नी म्हणून नाव आहे. मृताची मुले-मुली म्हणून बाजीराव, माया, मदन यांची नावे आहेत.

**०८.** पेन्शनधारकाचा अंगठयाचा ठसा व सही ज्या कागदावर घेतली जाते त्याच कागदावर तो त्याचे वारसदार यांचा संयुक्त फोटो चिकटवला जातो.हे खरे की, त्याची सत्यता प्राचार्या तपासतात. हे खरे की, त्यावरील अंगठे,सहया, फोटो हे सगळे प्राचार्यासमोरच केले जाते. हे खरे की, या फॉर्मवर मोहनराव जगताप व त्यांची पत्नी यांचा फोटो चिकटवला आहे. सदरचे मुळ कागदपत्र श्री मोहनराव जगताप हे घेऊन गेलेले आहे. हे खरे की, याचा मुळ कागद हा पेन्शनच्या मुळ संचीकेमध्ये आहे. हे खरे की, पेन्शनची मुळ संचीका पेन्शनधारकाला घेऊन जाता येत नाही. ती पेन्शनविभागाकडे असते. हे खरे की, या संचीकेची एक प्रत कॉलेजकडे व दुसरी प्रत संबंधीत निवृत्ती वेतनधारकाकडे असते. हे खरे की, कायदेशीर पुर्तता झाल्यावर मोहनराव जगताप यांना पेन्शन मंजूर झाली.

**०९.** मोहनराव जगताप मयत झाल्यानंतर दि.०४/०६/२०१८ रोजी त्यांच्या पत्नीचा अर्ज प्राचार्य शिवाजी कॉलेज उदगीर यांच्याकडे आला. हे खरे की, त्यानंतर प्राचार्यांनी तो अर्ज स्वीकारुन आवश्यक संचीका तयार करुन ती संचीका शिक्षण विभागाकडे पाठविली. ही सगळी संचीका शिक्षण विभागाने स्वीकारुन शिक्षण विभागाने जनाबाई यांच्या नावे कायदेशीरपणे पेन्शन सुरु केली. मोहनराव जगताप हयात असेपर्यंत त्यांच्या पेन्शन संचीका तयार करण्याबद्दल किंवा पेन्शनबद्दल तक्रारी अर्ज आलेला नाही. हे खरे की, अनुसयाबाई उर्फ सुलेखा यांचा पेन्शन फाईल तयार करताना किंवा मोहनराव जगताप मयत झाल्यानंतर लगेचच कोणताही अर्ज आलेला नाही. हे खरे की, सर्वसाधारणपणे जो पेन्शनचा हक्कदार आहे तो लगेच असा अर्ज करतो. हे खरे की, अनुसयाबाई यांचा अर्ज लगेच आलेला नाही. त्यांनी तक्रार दिली. हे खरे की, पेन्शन फाईल मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये हस्तक्षेप करता येत नाही आणि त्यांनतर आलेले तक्रारी अर्ज

बेकायदेशीर आहेत. हे खरे की, पूर्वीच सगळी पडताळणी झाली असल्याने पुन्हा पडताळीणी गरज पडलेली नाही.

**१०.** मोहनराव जगताप यांनी कोणते कागदपत्र कार्यालयातून स्वत:सोबत नेले हे मला माहिती नाही. हे खरे की, कार्यालयीन कागदपत्रे कोणालाही घेऊन जाण्याचा अधिकार नाही. हे खरे की, कार्यालयीन कागदपत्रे गहाळ झाल्यास किंवा कोणी घेऊन गेल्यास त्याबद्दल कॉलेज तक्रार करते. अशी कोणतीही तक्रार आजअखेर कॉलेजने केलेली नाही. कागदपत्रे कार्यालयात नाहीत. ती त्यामुळे मोहनराव घेऊन गेले असे मी म्हणतो. मात्र वस्तुस्थितीची मला माहिती नाही. हे खरे की, अनुसयाबाईंचे तक्रारी अर्ज जे आले त्यांची चौकशी झालेली आहे. हे खरे की, आमच्यासाठी त्या तक्रारींचा विषय राहिलेला नाही. हे खरे की, पेन्शन जनाबाई यांनाच मिळते.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**

**दिनांक ०७/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**